मराठी साहित्य मंडळ, कलबुरगी (गुलबर्गा)

या संस्थेचे त्रैमासिक

# भाव अनुबंध

Scanned with OKEN Scanner

मराठी साहित्य मंडळ, गुलबर्गा
या संस्थेचे त्रैमासिक

# भाव अनुबंध

वर्ष : ६ अंक : २

पौष, माघ, फाल्गुन शके १९४१
जानेवारी, फेब्रुवारी, मार्च २०२०

संपादक : श्री. भीमसेनराव माड्याळकर
कार्यकारी संपादक : श्री. सर्वोत्तम सताळकर
निवास (०८४७२) २५५८७८ / ०९२४२१९३७९२

संपादक मंडळ
श्री. विद्याधर मुरुगकर ★ श्री. व्यंकटेश वळसंगकर
सौ. वंदना किणीकर ★ डॉ. विजया तेलंग

संस्थेचा पत्ता : मराठी साहित्य मंडळ, स्टेशन बाजार,
गुलबर्गा (कलबुर्गी) ५८५१०२.
दूरभाष : कार्या. (०८४७२) २३२२०७ email-s.satalkar@yahoo.com
वेळ : सकाळी ८ ते ११ व सायं. ५ ते ८. गुरुवारी साप्ताहिक सुट्टी.

या अंकाचे मूल्य : रु. ५०/-
वार्षिक वर्गणी - वैयक्तिक रु. ३००/-, संस्थेसाठी रु. ४००/-
वर्गणी कुठल्याही महिन्यापासून चेक, डीडी अथवा मनीऑर्डरच्या माध्यमाने
'Editor Anubandh' या नावाने पाठवावी.

(संपादकीय व व्यवस्थापकीय पत्रव्यवहार, अभिप्रायार्थ भेट पुस्तके, नियतकालिके, प्रसिद्धीसाठी साहित्य इ. कार्यकारी संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावे. प्रसिद्धीसाठी साहित्य ईमेल वरही पाठविता येईल. या अंकातील लेखांत व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

Scanned with OKEN Scanner

## अंतरंग.....


☛ संपादकीय..... ३

☛ 'सूत्रपाठा'तील विचारसौंदर्य / प्रा. अविनाश आवलगावकर ६

☛ तेजस्वी अभिनय पर्व : डॉ. श्रीराम लागू / योगेश्वर देशपांडे २५

☛ 'वारणेच्या खोऱ्यात' व 'मास्तर' या कादंबऱ्यांतील स्वातंत्र्य चळवळीचे चित्रण / प्रा. डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात ३०

☛ चंद्र होता साक्षीला ! (कथा) / श्याम सावजी ४४

☛ सुंदरतेचं एक 'भाव' सुमन कविवर्य कृ. ब. निकुंब / प्रा. व्यंकटेश वळसंगकर ५३

☛ कन्नड कथाकार : केरुरु वासुदेवाचार्य / प्रा. डॉ. यशवंत नारायण पाटील ५६

☛ बॉर्डर / सौ. मेघा अंबिके ६१

☛ कविता.... कविता.... कविता.... कविता.... ७४

☛ भक्त, भक्ती आणि भगवंत (भाग दुसरा)/मदन कमलापूरकर ७८

☛ अभिप्राय..../ प्रा. सागर शरद कुलकर्णी ९२

☛ मंडळाची वाटचाल..... ९५

# ‘वारणेच्या खोऱ्यात’ व ‘मास्तर’ या कादंबऱ्यांतील स्वातंत्र्य चळवळीचे चित्रण

• प्रा. डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात

## प्रस्तावना

मराठी साहित्यातील संत व पंतांची साहित्यसरिता पुढे प्रवाहित करणाऱ्या शाहिरी साहित्याच्या धारेला शिवकालापासूनची परंपरा आहे. परंतु या साहित्यधारेला बहर आला तो पेशवाईत. पेशवाईच्या अस्तानंतर शाहिरांचा राजाश्रय संपल्याने त्यांना लोकाश्रय घ्यावा लागला. महाराष्ट्रात शाहिरीची परंपरा पुणे-नगर पाठोपाठ सातारा जिल्ह्यात वृद्धिंगत झाली. क्रांतिकारकांच्या या सातारा जिल्ह्यात स्वांतंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, लोकशाहीर पुंडलिक फरांदे व शाहीर कृष्णराव साबळे यांनी आपल्या सिद्धहस्त लेखणीने व आपल्या वैशिष्ट्यपूर्ण शाहिरी कर्तृत्वाने ३/४ तपांचा काळ गाजविला.

## महाराष्ट्रातील शाहिरांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील योगदान

शाहिरी काव्याला राजाश्रय मिळवून देणाऱ्या पेशवाईचा इ. स. १८१८ मध्ये अस्त झाला. शाहिरांच्या वाणीतील जोशही लयाला गेला. इंग्रजी अमलाखालील प्रदेशातही शाहिरी काव्य निर्माण झाले; परंतु त्यामध्ये मराठी बाणा नसल्याने ती कविता प्रभावी ठरू शकली नाही. १८५७ चे बंड क्रांतीच्या रूपाने झळाळून उठले व त्यामुळे मृतवत झालेल्या शाहिरी वाङ्मयालाही नवसंजीवनी मिळाली. स्वातंत्र्यवीरांच्या, क्रांतिकारकांच्या पराक्रमाचे सूत्र धरून पल्लवीत झालेल्या पोवाड्यांचा हा कालखंड स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तग धरून होता. स्वातंत्र्योत्तर कालखंडात भारताने लोकशाहीचे तंत्र स्वीकारले. यातच मराठी भाषिकांचे स्वतंत्र महाराष्ट्र राज्य निर्माण झाले. सार्वत्रिक शिक्षणाचे तत्त्व महाराष्ट्र सरकारने स्वीकारून प्रादेशिक विद्यापीठांची निर्मिती केली. या शिक्षणप्रणालीमुळे शहरांप्रमाणेच ग्रामीण भागातील तरुणही सुशिक्षित झाला व आपल्या अभिव्यक्तीसाठी धडपडू लागला. या सुशिक्षित वर्गाचा साहित्यिक जिव्हाळा वाढल्याने त्यातून अभ्यासक



Scanned with OKEN Scanner

संशोधकांचा वर्ग उदयाला आला. संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतर मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी मराठी भाषा व संस्कृती यांच्या वृद्धी-समृद्धीसाठी जी काही धोरणे अवलंबिली त्यामुळे लोकनाट्य, लोकसाहित्य व लोककला यांना प्रोत्साहन मिळाल्यामुळे पुन्हा एकदा शाहिरी साहित्यनिर्मितीला चांगले दिवस आले. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात शाहीर अण्णा भाऊ साठे, अमर शेख व गव्हाणकर यांचेही मोलाचे योगदान आहे. या तिघांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव करताना शाहीर आत्माराम पाटील म्हणतात, ''मुंबईसारख्या बहुश्रुत व क्रांतिप्रवण शहरात शाहिरी प्रतिभेने विकसित झालेले 'अमर अण्णा दत्ता' हे तीन शाहीर तसेच प्रा. वसंत बापट आणि महाराष्ट्रातील काही पुरोगामी वैचारिक व विधायक क्रांतीचे आधुनिक काळी साठी उलटलेले असे शाहीर हे पारतंत्र्य व स्वातंत्र्य ह्या संक्रमणकालाचे शाहीर झाले आणि लोकशाही समाजवादाच्या राष्ट्रीय सिद्धांताने शाहिरी प्रबोधन प्रणालीतही पूर्णत: स्थित्यंतर झाले असले तरीही ह्या त्रिवर्य शाहिरांची एकजीवी शाहिरी प्रतिभा अनेक झर-निर्झरांतून झालेल्या एखाद्या नदीच्या प्रचंड वेगाने कल्लोळत्या धबधब्यासारखी भन्नाट उडी ठोकून वैचारिक क्रांतीची तेजस्वी विद्युतनिर्मिती करीत लोकशाही स्वातंत्र्ययुगाच्या सकाळच्या पारीही महाराष्ट्र-राष्ट्रात प्रेरणादायी स्वरूपात प्रसारित पावली हे ह्या त्रिवर्य शाहिरांच्या शाहिरीचे ठळक व ऐतिहासिक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.''[१] संयुक्त महाराष्ट्राच्या अनुषंगाने अण्णा भाऊंनी लिहिलेली 'माझी मैना गावावर राहिली !' ही छक्कड त्यांच्या महाराष्ट्रप्रेमाची प्रचिती देते. या एका लावणीवर उत्तम कांबळे यांनी पुस्तिका लिहून त्यावर मार्मिक टिपणी केली आहे. डॉ. सोमनाथ कदम म्हणतात, 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची 'माझी मैना गावावर राहिली' ही छक्कड आजपर्यंत केवळ मनोरंजनाचे साधन म्हणून गायिली, वाचली जात होती. त्या छक्कडीतील ओळी-ओळींतील मतितार्थ वाचकांच्या समोर आणण्याचे व एका अर्थाने थंड पडलेल्या संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाची धार वाढविण्याचे मोठे कार्य समीक्षक उत्तम कांबळे यांनी केलेले आहे. सुजाण वाचकांनी एका दमात समजून घ्यावे असे हे पुस्तक सीमाबांधवांसाठी ऊर्जा देणारे आहे हे नक्की.' (दै. तरुण भारत, 'अक्षरयात्रा' पुरवणी, पृ. क्र. ०७, १९ जानेवारी २०२०) हे विवेचन वाचल्यावर संयुक्त महाराष्ट्राचा लढा अजूनही अपूर्ण असल्याची जाणीव होते. अण्णा भाऊंच्या मनातील सल '....गावाकडं मैना माझी । भेट नाही तिची । तीच



Scanned with OKEN Scanner

गत झाली आहे या खंडित महाराष्ट्राची । बेळगाव, कारवार डांग, उंबरगावावर मालकी दुजांची । धोंड खंडणीची । कमाल दंडेलीची । चीड बेकीची । गरज एकीची । म्हणून विनवणी आहे या शिवशक्तीला शाहीराची ।' या चरणांतून व्यक्त होते. ही एक छक्कड लिहूनही अण्णा भाऊ अजरामर झाले असते असे म्हणावेसे वाटते. अशाप्रकारे शाहिरांनी भारतीय स्वातंत्र्यचळवळीबरोबरच संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातही मोलाचे योगदान दिलेले आहे.

## जगण्यासाठी लढणाऱ्या माणसांच्या कथा

'अण्णा भाऊंचे साहित्य म्हणजे जगण्यासाठी लढणाऱ्या माणसांच्या कथा आहेत.' असे एका वाक्यात मार्मिकपणे अण्णा भाऊंच्या साहित्याचे वर्णन आचार्य अत्रे यांनी केले आहे. अण्णा भाऊंच्या साहित्यातून अवतीर्ण होणाऱ्या व्यक्तिरेखा कल्पनारंजनातून येत नसत; तर त्या त्यांच्या भोवताली वावरणाऱ्या, त्यांच्याशी बोललेल्या, राहिलेल्या वास्तवातल्या होत्या. त्यांच्या साहित्यातील प्रत्येक पात्र त्यांनी पाहिलेले व अनुभवलेले होते. त्यामुळेच 'बरबाद्या कंजारी'च्या प्रस्तावनेत ते म्हणतात, 'मी जे जीवन जगतो, पाहतो, अनुभवतो, तेच लिहितो. मला कल्पनेचे पंख लावून भरारी मारता येत नाही. त्याबाबतीत मी स्वत:ला बेडूक समजतो.' 'फकिरा' ही अण्णा भाऊंची सगळ्यात लोकप्रिय कादंबरी. यामध्ये अण्णा भाऊंनी आपल्या मामाचाच ब्रिटिशांबरोबरचा तसेच स्वकियांबरोबरचा संघर्ष मांडला आहे.'[२] तर 'ज्यांच्याबरोबर एके काळी चले जाव चळवळीत काम केले त्या बेर्डे गुरुजींवर त्यांनी 'मास्तर' ही कादंबरी लिहिली.'[३] त्यांच्या 'वारणेचा वाघ'मधील सत्तू भोसले अण्णा भाऊंच्या व्यक्तिमत्त्वातील बंडखोरी वृत्तीचे प्रतिनिधित्व करतो. त्याचे सावकार, जमीनदार व ब्रिटिश यांच्या विरोधातील बंड प्रथम लेखकाच्या मन:पटलावर उमटते. त्यांच्या फकिरा या क्रांतिकारी नायकास सरकारकडे धान्याची गोदामे भरलेली असताना सर्वसामान्य जनतेने उपाशी राहावे हे मान्य नाही. त्यामुळेच तो ती गोदामे लुटून सर्वांसाठी मोकळी करतो. त्यात तो कसल्याही भेदभावाला बळी पडत नाही. अन्नासाठी तरसलेल्या सर्वांसाठी तो धान्याचे भांडार खुले करतो. लेखकाच्या सर्वधर्मसमभावाचा तो प्रतिनिधीच शोभतो. शोषितांचा व पिडीतांचा तो कैवारी शोभतो.

फकिरा, धुंद, अग्निदिव्य, वारणेचा वाघ, वारणेच्या खोऱ्यात, मास्तर अशा अनेक कादंबऱ्यांतून क्रांतिकारी व पराक्रमी नायक अण्णा भाऊंनी रेखाटले



Scanned with OKEN Scanner

आहेत. समाजातील अठरापगड जातींतील (महार, मांग, वडार, डोंबारी, गारुडी, फासेपारधी, बेलदार, गोंधळी) अशा उपेक्षित समजल्या जाणाऱ्या जाती-जमातीतील व्यक्तींना त्यांनी नायकत्व बहाल केले. वासुदेव मुलाटे म्हणतात, 'मराठीमध्ये, श्री. म. माटे यांनी 'उपेक्षितांचे अंतरंग' उलगडून दाखविले; परंतु माटे स्वत: उपेक्षित समाजातून आलेले नव्हते. अधांतरावर जीवन जगणाऱ्या दलित, पीडित, उपेक्षित माणसांच्याविषयी त्यांच्या मनात गाढ अशी कणव होती, सहानुभूती होती; परंतु अण्णा भाऊ स्वत: अशा दलित, पीडित, उपेक्षित समाजात जन्मलेले होते. म्हणून आपल्या समाजाच्या उपेक्षेची आंच, वेदना ते अधिक प्रकर्षाने समजू शकत होते.'[४]

**अण्णा भाऊंच्या भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या**

अण्णा भाऊंचे महाराष्ट्राच्या मातीवर जसे अगाध प्रेम होते; तसेच भारतमातेवरही अतीव श्रध्दा व निष्ठा होती. त्यामुळेच त्यांनी साकारलेला प्रत्येक नायक देशप्रेमाची भाषा बोलतो. मास्तर, सत्तू भोसले, फकिरा, राणोजी, हिंदुराव ह्या सर्व व्यक्तिरेखा क्रांतिकारी विचारांच्या व देशप्रेमाने भारलेल्या आहेत. 'वारणेच्या खोऱ्यात' व 'मास्तर' या दोन कादंबऱ्यांतून इंग्रजांच्या विरुद्धचे बंड अण्णा भाऊ रेखाटतात. भारतीय स्वातंत्र्यचळवळीच्या काळात अण्णा भाऊंच्या लेखणीला बहर आला होता. अशा काळातील राजकीय घडामोडींचे प्रतिबिंब त्यांच्या साहित्यात न उमटेल तरच नवल. अण्णा भाऊंच्या साहित्याबद्दल प्रा. विजयकुमार जोखे म्हणतात, 'वारणा, कृष्णा नदीच्या परिसरातील माणसे इथे आहेत. इंग्रजांच्या आशीर्वादाने क्रिमिनल गुंड पोसले जात होते. या गुंडांची गुंडगिरी, त्यांनी स्त्रियांच्या अब्रूवर घातलेले दरोडे, गुंडांची व्यसनाधीनता, स्वातंत्र्य सैनिकांचा लढा, यांचे त्यांच्या कथा-कादंबऱ्यांतून चित्रण झाले.'[५] १९४२ मध्ये महात्मा गांधींनी इंग्रजांना 'चले जाव' असे ठणकावून सांगितले. अण्णा भाऊंनी नेमका याच वर्षी लेखनास प्रारंभ केला. सारा देश या आंदोलनात सहभागी झाला. अण्णा भाऊंसारखा संवेदनशील व देशप्रेमाने भारलेला लेखक यापासून दूर कसा राहील ? सदर आंदोलनाचे प्रतिबिंब म्हणजेच या दोन कादंबऱ्या आहेत.

**१. वारणेच्या खोऱ्यात**

'वारणेच्या खोऱ्यात' ही अण्णा भाऊंची कादंबरी १९५१ साली प्रकाशित



Scanned with OKEN Scanner

झाली असली तरी, कादंबरीतील कथानकाचा विचार करता अण्णा भाऊंनी ती १९४२ च्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर लिहिल्याचे जाणवते. हिंदुराव व मंगला यांचे प्रेम मानवी पातळीवर सुरू होऊन देशप्रेमाच्या वेदीवर दोघांच्या आत्मबलिदानाने समर्पित होते. हिंदुराव, मल्हारी, गणू व शिवा या बंडखोरांनी इंग्रजांच्याविरुद्ध बंड पुकारले आहे. तर नागोजी पाटील, देववाडीचा दत्तू, पुणाळचा सत्तू आणि विवरचा म्हादू रामोशी व गण्या धनगर या गद्दारांनी इंग्रजांशी हातमिळवणी करून हिंदुरावचा सहकारी आबा याला घरी जेवायला बोलवून विश्वासघाताने गोळी घालून मारले.

कृष्णाजी, त्याची पत्नी राधाबाई, मुलगा हंबीर व मुलगी मंगला असे यांचे चौकोनी कुटुंब आहे. या चौकोनी कुटुंबाला मंगलाच्या लग्नाची चिंता आहे. मंगला नाकीडोळी ठसठसित असणारी मुलगी, तिचे लग्न कृष्णाजीचा मित्र पांडू पाटील याचा मुलगा राजाराम याच्याशी ठरते, लग्नाची पूर्ण तयारी होते, लग्न चार दिवसांवर येऊन ठेपते; पण पांडू पाटलाची बायको फोड्याचा रोग येऊन अचानक मरते व लग्न तीन वर्षे पुढे ढकलावे लागते. कृष्णाजी तीन वर्षांनी जाऊन पाहतो तो राजाराम एक वर्ष गावातून परागंदा झालेला असतो. अशी एखाद्या सिनेमाला साजेशी अशी कथा या कादंबरीला लाभलेली आहे.

कथानक साकारताना अण्णा भाऊंनी नायक असणारा हिंदुराव धाडसी, नायिका असणारी मंगला जोरकस बांध्याची 'शंभर सुंदर मुलींतून सुंदर म्हणून कोणीही निवडील अशी ती मुलगी होती', (पृ. क्र. १२७) तर खलनायक असणारा नागोजी कुरूप असा रेखाटला आहे. 'नागोजी दिसायला मुळीच देखणा नव्हता; पण लोक त्याला लवून मुजरा करीत असत. तो रंगाने काळासावळा, मध्यम उंचीचा होता व त्याला वाताचा रोग जडल्यामुळे त्याचे शरीर फारच अवजड झाले होते. त्यामुळे तो ओबड-धोबड चिखलाच्या पुतळ्याप्रमाणे दिसे आणि जेव्हा तो चालू लागे, तेव्हा त्याचे सर्व शरीर फाटक्या गोधडीच्या चिंध्यांप्रमाणे लोंबकळून हादरत असे.' (पृ. क्र. १३६)

वरील प्रमाणे कादंबरीच्या पूर्वार्धातील ढोबळ असणारे कथानक योग्य वळणावर कलाटणी घेते. नागोजीची आणि हंबीरची मैत्री, कृष्णाजी आणि हिंदुरावचे सख्य, हिंदुरावचे आणि मंगलाचे प्रेम. या प्रसंगांमुळे उत्तरार्धात कथानकाला कलाटणी मिळते. सुरुवातीला स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय असणारा नागोजी इंग्रजांचा माफीचा साक्षीदार होतो आणि क्रांतिकारकांचा कर्दनकाळ

बनतो. त्याने आता हिंदुरावाला मारण्याचा चंग बांधला होता. त्यात त्याला हंबीरची साथ मिळते. हंबीरचे मित्रप्रेम व मंगलाच्या मनातील द्वेष व्यक्त करण्यासाठी लेखक अशी शब्दयोजना करतात, 'आपल्यापेक्षा मोठा श्रीमंत शेतकरी व इनामदार पोलीस पाटील त्याच्याशीच मंगलाने लग्न करावे म्हणून हंबीर हट्टाला पेटला होता आणि आंधळा, म्हातारा, सरकारची माफी मागून सुटलेला, म्हणून मंगला त्याला विरोध करीत होती.'(पृ. क्र. १२८)

शेवटी कादंबरीचे कथानक नाट्यमय वळण घेते. इंग्रजांविरुद्ध बंड करणारा हिंदुराव; आपणच पांडू पाटलाचा फरारी मुलगा राजाराम असल्याचे स्वत: मंगलाला सांगतो व हे गुपित योग्यवेळ आल्यावर सर्वांना सांगण्याचेही तिच्याकडून वचन घेतो. पुढे हिंदुरावच्या स्थळासाठी गणू व शिवा कृष्णाजीकडे जातात, लग्न ठरते, हंबीरला डांबून ठेवून लग्नसमारंभ पार पडतो. कृष्णाजी नवदांम्पत्याला आपल्या मळीवरचे घर देतो. त्यामुळे हंबीर जास्तच चिडतो आणि नागोजीला म्हणतो, 'बहिणीचं कुंकू पुसल्यात जमा आहे.' (पृ. क्र. १७४) नागोजी हंबीरच्या मदतीने तिनशे पंजाबी पोलीस घेऊन मळीच्या घरावर चालून जातो. हिंदुराव मंगलाच्याही हाती बंदुक देतो आणि रणसंग्राम सुरू होतो. या संग्रामात नागोजीतर मारला जातोच; पण शेवटी हिंदुरावची काडतुसेही संपतात, तेव्हा तो मंगलाला म्हणतो, 'मंगला ! जर माझा अपमान होऊ नये असं तुला वाटत असेल तर तू तुझं ते शेवटचं कांडतूस माझ्यावर झाड.' (पृ. क्र. १८६) तर उत्तरादाखल मंगला म्हणते,' तुम्हीही तुमचं शेवटचं काडतूस माझ्यावर झाडा आणि दोघं...हो...मी मागं राहून जन्मभर झुरून मरण्यापेक्षा मी म्हणते तसंच करा.' (पृ. क्र. १८६) अशा प्रकारे दोघांचाही देशस्वातंत्र्यासाठी बळी जातो. अंण्णा भाऊंनी मंगलाच्यारूपाने एक झुंझार नायिका येथे रेखाटली आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्यासाठी लेखकाने प्रसंगी नायिकेच्याही हाती शस्त्र दिल्याचे दिसते. डॉ. शरद गायकवाड म्हणतात, 'स्त्रीच्या हातात बंदुक देऊन क्रांतिकारकांच्या खांद्याला खांदा लावून लढणारी नायिका अण्णा भाऊंनी मराठी कादंबरीत प्रथमच मांडली.'[६]

## २. मास्तर

सदर कादंबरीच्या सुरुवातीलाच लेखकाने धनगरवाडी गाव व पंचक्रोशी कशी देशप्रेमाने भारावलेली आहे हे सांगण्यासाठी -



Scanned with OKEN Scanner

*'बंदूक ठासून उठे शेतकरी तेली-तांबोळी ।*
*गुलामगिरीची होळी पेटवून मग मारी गोळी ॥'* (पृ. क्र. २९१)

अशा समर्पक पोवाड्याचा वापर केला आहे. यातून समाजातील सर्वच लोक एकनिष्ठ होऊन देशासाठी झटत असल्याचे दिसून येते. या कादंबरीचा नायक 'मास्तर' हा पेशाने शिक्षक आहे. त्यांच्या मनातील देशप्रेमाच्या ठिणगीने आता वणव्याचे स्वरूप धारण केले आहे. पंचक्रोशीतील पोलीस पाटील सोडले तर सर्वजण त्यांना मदत करताना दिसतात. स्वातंत्र्यलढ्याचे वर्णन करताना अण्णा भाऊ म्हणतात, 'बेचाळीस साल सरकत होते. ते दिवस भारतीय जनतेच्या जीवनात अभूतपूर्व असे होते. सर्व भारत आपल्या स्वातंत्र्यासाठी जिवाची पर्वा न करता लढत होता. त्यानं सर्वस्व पणाला लावलं होतं नि साक्षात मृत्यूवर तो धडका घेत होता. आपल्या स्वातंत्र्याचा महान अरुणोदय पाहण्यासाठी सारा देश उत्सुक झाला होता.' (पृ. क्र. २९३)

डोंगर उतरून मास्तर धनगरवाडीच्या सखारामच्या घरी पोचल्याची बातमी देवगावचा सुभानराव पाटील मणियार फौजदाराला देतो. त्यानुसार साऱ्या गावाची झडती घेतली जाते. मास्तरच्या संपर्कात येणारा प्रत्येकजण देशप्रेमाने झपाटलेला होता. नुसती माणसंच नव्हे तर सखारामच्या मेंढरांची राखण करणारा वाघ्या कुत्राही मास्तरला मदत करतो. धनगरवाडीत मेंढरांच्या कळपात लपलेल्या मास्तरला शोधण्यासाठी फौजदार, डी. एस. पी. व तीनशे पोलिस सज्ज झाले होते. मणियार फौजदार बॅटरीचा प्रकाशझोत मेंढरांच्या कळपात लपून बसलेल्या मास्तरच्या दिशेने टाकतोही; पण वाघ्या कुत्रा त्याला एकही पाऊल पुढे टाकून देत नाही. डी. एस. पी. मणियारला म्हणतो, 'मणियार, त्याला गोळी घालू नका. जबर आहे जनावर. अहो, तुम्ही सरकारी अधिकारी, तुम्हाला तो त्या मेंढरांकडे पाऊल टाकू देत नाही, मग त्या मास्तरला कसा मेंढरात येऊ देईल ? चला-' (पृ. क्र. ३०१) पोलीस निघून गेल्यावर मास्तर वाघ्याला मिठी मारतात आणि-'...सद्‌गदित होऊन म्हणाले, 'वाघ्या ! वाघ्या ! अरे, तू माणसाच्या जन्माला का आला नाहीस ? तुझे हे उपकार मी कसे फेडू आणि कोणत्या जन्मी फेडू ? आणि भारताच्या मुक्तीसाठी साताऱ्यात एक वाघ्या नावाचा कुत्राही लढला हे कुणाला सांगून तरी पटेल का ?'(पृ. क्र. ३०१) या प्रसंगातून अण्णा भाऊंनी सारा प्रदेश कसा देशप्रेमाने भारावला होता याचे प्रत्यंतर दिले आहे.



Scanned with OKEN Scanner

देशप्रेमाने झपाटलेल्या मास्तरांना स्वत:च्या संसाराकडे व बायकोकडेही लक्ष द्यायला वेळ नव्हता. त्यांची पत्नी सरस्वतीबाई याही एक सत्त्वशील शिक्षिका होत्या. मास्तरांच्या देशभक्तीविषयी लेखक म्हणतात, 'मास्तरला पुष्कळ दिवसांपासून देशभक्तीचं वेडं होतं. तो देशासाठी, देशाच्या स्वातंत्र्यासाठी झटत होता. गुलामगिरीची त्याला चीड होती नि तो रोज आपल्या विद्यार्थ्यांना देशभक्तीचे धडे देत होता. गांधी, नेहरू यांच्या कर्तृत्वाची माहिती सांगत होता. माणसानं देशासाठी जगावं नि देशासाठी मरावं, असा तो मुलांना शिकवीत होता.' (पृ. क्र. ३०४) अशा प्रकारे देशाची काळजी करणारा मास्तर बायकोच्या आजाराकडे मात्र लक्ष देत नव्हता. तिचे मास्तरवर नितांत प्रेम होते. ती मृत्यूशय्येवरती पडलेली असतानाही देश आणि शाळा म्हणजेच भक्ती आणि कर्तव्य यामध्येच मास्तर गुंतलेले होते. सरस्वतीबाईंच्या आजाराकडे लक्ष द्यायचे असे ठरवूनही तो लक्ष देऊ शकत नव्हता. 'सरस्वतीबाई दवाखान्यात पडली होती. तिच्या प्रकृतीत कसलीच सुधारणा होत नव्हती. शाळा नि घर सांभाळून मास्तर रोज दवाखान्यात जाऊन येत होता. काचेचं भांडं तडकावं तसा त्याच्या सुखी संसाराला एक प्रकारे तडा गेला होता.'(पृ. क्र. ३०७) आणि एक दिवस मास्तर कर्तव्य बजावत असतानाच सरस्वतीबाईंच्या निधनाची बातमी येऊन ठेपते. अशा दु:खातही मास्तरच्या धनगरवाडी ते देवगाव अशा फेऱ्या चालू होत्या. धनगरवाडीचा सखाराम मास्तरचा भक्त होता. त्याच्या आग्रहाखातर मास्तर मालन नावाच्या तरुणीशी विवाहबद्ध होतो. मास्तरच्या आयुष्यात आलेली ही दुसरी स्त्री असली तरी, तिच्या वागण्या-बोलण्यात सरस्वतीबाईंची छबी दिसत होती त्यामुळे मास्तर अचंबित व्हायचा, दचकायचा, अबोल व्हायचा; मालनला हे काय होतंय हे कळायचं नाही. तिला वाटायचे, आपलंच काहीतरी चुकतंय. त्यावेळी मास्तर खुलासा करायचा-'तुझी प्रत्येक हालचाल सरस्वतीसारखी होते. तिनं माझ्यावर अपार प्रेम केलं आणि अचानक ती मला मध्येच सोडून गेली आणि तू आलीस.... तू तिच्याप्रमाणंच माझ्यावर प्रेम करतेस. एवढंच नव्हे मालन, तर तू तिचीच भाषा बोलतेस -तिनं उच्चारलेला शब्द नकळत बोलतेस नि ते ऐकून मी भयभीत होऊन जातो आणि कधी कधी वाटू लागतं की, ती जशी अमर्याद प्रेम करून गेली तशी तूही जाणार की काय ? बस्स, हा एकच विचार मनात आला की, खिन्न होतो, दुसरं काही नाही. समजलं? ज्या जागी सरस्वती बसून माझी वाट पाहत होती,



Scanned with OKEN Scanner

त्याच जागी तुला बसलेली पाहिली की, मी बेचैन होतो. तू जागत बसशील, जेवणार नाही नि मग आजारी पडशील या केवळ कल्पनेनं माझं डोकं सुन्न होतं.' (पृ. क्र. ३१४) असे एकमेकांवर निस्सिम प्रेम करणाऱ्या मास्तरांना देशस्वातंत्र्यासाठी प्रेमाचे समर्पण करावे लागले. सरकार मास्तरला पकडण्यासाठी जीवाचे रान करीत होते. अण्णा भाऊ साठे म्हणतात, 'तो जनतेच्या प्रेमाचं कवच घालून अजय होता नि त्याचा जनतेच्या ऐक्यावर विश्वास होता. जनता ही सर्वश्रेष्ठ आहे, असं त्याचं मन सांगत होतं. म्हणूनच तो घडोघडी मृत्यूला गुंगारा देत होता. अनेक तरुण त्याच्या शब्दावर प्राण द्यायला तयार होते. मृत्यूला ते कस्पटासमान मानीत होते. त्या झुंजेत मुसलमान झुंजत होता, मराठा झुंजत होता, मांग झुंजत होता, नि महार झुंजत होता. जागोजाग झटापटी झडत होत्या, बंदुका गरजत होत्या. रक्ताचे सडे सांडले जात होते. का, तर त्या रक्तावरून आपल्या भावी स्वातंत्र्याचा महान क्षण यावा ! जनता सुखी व्हावी ! हे दारिद्र्य नष्ट व्हावे आणि आम्ही भारतीयांनी मानाने जगावे !' (पृ. क्र. ३१५) सरकारने मास्तरला पकडणाऱ्याला पाच हजार रुपयांचे रोख बक्षीसही ठेवले होते. त्यामुळे त्याला बायकोला सोडचिठ्ठी द्यावी लागली. पोलिसांना दाखविण्यासाठी ही सोडचिठ्ठी दिली असली तरी, पुढे मास्तर पकडला गेल्यावर मालनला दुसरे लग्न करण्याची अनुमती देतो.

**जेव्हा 'गुरू' जागा होतो !**

पंचक्रोशीतील सगळेच पोलीस पाटील इमाने-इतबारे सरकारची चाकरी करीत होते. त्यात संभापूरचा रघूजी पाटील, टाकळीचा चिंतू पाटील, धनगरवाडीचा रावजी पाटील यांचाही समावेश होता. देवगावचा सुभानराव पाटील आणि त्याचा मेव्हणा रघू पाटील तर मास्तरवर पाळत ठेवून होते. अशी सेवा करूनही अष्टे गावचा खजिना लुटला जाण्याची पूर्वकल्पना न मिळाल्याने प्रांत व डी. एस. पी. या पाटलांवर चिडतात. अशी अपमानास्पद वागणूक मिळाल्याने सुभानराव व्यथित होतो. आपण देशद्रोहीपणे वागल्याची भावना त्याच्या मनात तयार होते, 'ढोलकं दोन्हीकडून वाजतं, तद्वत आपल्या जन्माचं झालं आहे, घरचं खाऊन आपण लष्कराच्या भाकऱ्या भाजीत आहोत, सरकारी बाजू घेऊन अनेक वैरी पदरात घेतले. मृत्यूशी ढाली बांधली, पण....त्याबद्दल मला काय मिळालं ? हा एकच प्रश्न तो स्वतःला विचारीत होता.'(पृ. क्र. ३२६) सुभानरांव अशा विमनस्क



Scanned with OKEN Scanner

अवस्थेत असतानाच मास्तर त्याच्या वाड्याच्या आवारात प्रवेशतो. दोघांच्यात झटापट होते. दोघेही रक्तबंबाळ होतात. मास्तर आपला सहकारी सयाजीला सुभानरावाचे पाय बांधून ओढण्याचा आदेश सोडतो; पण तेवढ्यात सुभानरावाचा मुलगा काशिनाथ हंबरडा फोडतो, 'नका गुरुजी, तुम्ही माझ्या बाबांना ठार मारू नका. मी...मी पाया पडतो.' (पृ. क्र. ३२७) आपल्या विद्यार्थ्याच्या अशा आर्त हाकेमुळे मास्तरातला 'गुरू' जागा होतो. अण्णा भाऊ म्हणतात, 'आणि क्षणात त्याच्यातील तो जुना मास्तर प्रकटला. खडकाला पाझर फुटावा तसा त्याच्या हृदयात एक पाझर फुटला. रात्रीचा दिवसात प्रवेश व्हावा तसा चमत्कार झाला आणि देशभक्त मास्तर लुप्त होऊन एक प्रेमळ मास्तर अवतीर्ण झाला. एक धगधगता सूर्य अस्त पावून नव्या पिढीला नवे ज्ञान देणारा मास्तर विचारमग्न झाला. तो कळवळला. त्यानं उठून लोळणाऱ्या काशिनाथाला उचलून पोटाशी धरलं. त्याच्या कृद्ध डोळ्यांत प्रेमाची कृष्णा प्रवर्तली.' (पृ. क्र. ३२८) मास्तर मधील 'गुरू' जागा झाल्याने सुभानरावाचे प्राण वाचतात व त्याला चांगली अद्दलही घडते.

**'मास्तर' एक अधुरी प्रेमकहाणी**

मालनला भेटण्यासाठी मास्तर संभापूरात तिच्या घरी जातो. तिच्या आईवडिलांना जावयाविषयी आदर असला तरी त्यांना लेकीच्या भविष्याची काळजी वाटत होती. मालनचा थोरला भाऊ राम मात्र नव्या विचारांचा असल्याने त्याच्या हृदयात मास्तरांविषयी अपार आदर होता. मास्तर थोडे दिवस राहून निघण्याचा निर्णय घेतो तेव्हा राम त्यांना सुखरूपपणे सावर्ड्याच्या डोंगरात सोडून येतो. लेकीच्या काळजीने अंताजीराव म्हणतात, 'परंतु या लोकांना देशभक्तीचं खूळ भरलं आहे. बायका-मुलांनी रडत कढत जगायचं आणि यांनी बंदुका घेऊन डोंगरात फिरायचं. परंतु सरकारकडे फार बंदुका आहेत.' (पृ. क्र. ३३६) आणि नेमके तसेच घडले. ज्या गोसाव्याला मास्तरने जीवदान दिले त्यानेच सरकारला मास्तरचा पत्ता सांगितला. त्यामुळे डोंगराला वेढा पडला. लढता लढता मास्तरची काडतुसे संपतात आणि मास्तर जेरबंद होतो. त्यांच्यावर खटला भरण्यात येतो. खटल्याचा तीन महिन्यांनी निकाल लागतो. मास्तरला चाळीस वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा होते. सलग चार वर्षे मालन त्याला भेटायला जाऊन एकच प्रश्न विचारायची 'मी काय करू?' शेवटी मास्तर तिला निर्णय देताना अंताजीरावाला पत्र लिहून



Scanned with OKEN Scanner

कळवतो, 'मी सुटून येईन अशी मला आशा नाही. मी या तुरूंगातच मरणार आहे. म्हणून तुम्ही मालनचा दुसरा घरोबा करून देणे. आता माझी वाट पाहू नये.' (पृ. क्र. ३४४) या नुसार मालन नाईलाजाने नवीन संसार थाटते आणि 'तेराव्या दिवशी काँग्रेसचं नवं मंत्रीमंडळ सत्तारूढ झालं. त्यानं 'सर्व राजबंदी सोडावे' असा पहिला हुकूम काढला.' (पृ. क्र. ३४४) मास्तरांचीही सुटका होते, पण जायचे कुठे ? हा त्यांच्यापुढील यक्ष प्रश्न होता. सर्व राजबंदी आपापल्या गावी गेले. गावच्या वेशीवर त्यांचे स्वागत झाले, मिरवणुका निघाल्या. मास्तर आपल्या सहकाऱ्यांसोबत चालत राहिला, त्यांना पाहण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा गर्दी जमली होती. ते गाव मालनचे होते. ती आपल्या नव्या घरासमोर उभी होती. तिचे डोळे पाण्याने डबडबलेले होते. मास्तर घरापासून पुढे निघून गेले. 'मालन रडू लागली....तिच्या डोळ्यांत अश्रूंनी गर्दी केली. मास्तर त्या अश्रूंत बुडाले नि चालू लागले...'(पृ. क्र. ३४४)

## क्रांतिकारकांचा सातारा जिल्हा

महाराष्ट्रातील सातारा जिल्हा म्हणजे मर्द मावळ्यांचा सातारा ! आपल्या शिवबाचा सातारा ! सप्तताऱ्यांचा सातारा ! मराठ्यांची दुसरी गादी सांभाळणारा सातारा ! अण्णा भाऊंचा सातारा ! यशवंतरावांचा सातारा ! कर्मवीरांचा सातारा ! क्रांतिवीरांचा सातारा ! कृष्णा-कोयनेचा सातारा ! समर्थांच्या व संतांच्या आध्यात्माचा सातारा ! निसर्गाचा हिरवा शालू परिधान केलेला सातारा ! अशी साताऱ्याची सर्वदूर ख्याती आहे. अण्णा भाऊंचेही साताऱ्यावर प्रेम होते. वारणेच्या खोऱ्यात या कादंबरीत ते म्हणतात, 'त्या राजवटीला गिळून टाकण्यासाठी सातारा जिल्हा सज्ज झाला होता. कोण देशभक्त, कोण देशद्रोही, कोण दरोडेखोर व कोण बंडखोर, हे काहीच कळत नव्हते आणि 'वारा सुटला आहे, उफणून घ्या' ही म्हण सर्वामुखी प्रचलित झाली होती आणि इंग्रजी जिल्ह्यातून मराठा सैनिक काढून घेऊन पंजाबी सैनिक पुढे लोटले होते. कारण इंग्रज राज्यकर्त्यांना मोठी भीती वाटत होती.'(पृ. क्र. ९२०) तर मास्तर कादंबरीत साताऱ्याविषयी असे वर्णन येते - 'उभा सातारा जिल्हा 'बंदूक ऽ बंदूक ऽ' करीत होता. शेतात पेरण्यासाठी बी पाहत फिरणारा तो शेतकरी आता एक-एक काडतूस हुडकीत होता. त्यासाठी जिवाचं रान करीत होता. गोव्यापासून मुंबईपर्यंत त्यांची दौड सुरू झाली होती.' (पृ. क्र. २९४) तसेच सातारा ज्या सह्यगिरींच्या रांगांमध्ये वसला आहे त्याचे वर्णन असे येते - 'त्या अंधारातच सह्याद्री अचल उभा होता. उलट त्याची भव्यता



Scanned with OKEN Scanner

नि गंभीरता अधिकच वाढली होती. तो महाराष्ट्राचा वाली, देशभक्तांचा कैवारी, बंडवाल्यांचा पाठीराखा जागा होता नि त्याची डोंगरी दुनिया त्याच्या कुशीत निवांत निद्रा घेत होती.' (पृ. क्र. २९१) लढवय्या सातारा जिल्ह्याविषयी लिहिताना अण्णा भाऊंची लेखणी थकत नाही उदाहरणादाखल.हे वर्णन पाहा-'सातारा लढत होता..... महाराष्ट्र लढत होता ! ज्याची तुलना काहींनी फक्त जर्मन राष्ट्राशीच केली होती तो महाराष्ट्र लढत होता आणि त्या महान महाराष्ट्राचा कलिजा जो सातारा, तो लढत होता. लढणे हा ज्यांचा धर्म आहे ते लढत होते आणि आपल्या देशाच्या मुक्तीसाठी लढता लढता मरत होते.' (पृ. क्र. ३३८) अशा वर्णनांमुळे कादंबरीतील शब्दांनाही धार आली आहे. क्रांतिकारकांचा व भूमीगतांचा आश्रयदाता असणाऱ्या सह्याद्रीचे व साताऱ्याचे वर्णन वाचून वाचकांच्या मनातही देशप्रेमाचे स्फुर्लिंग जागृत होते हे अण्णा भाऊंच्या लेखणीचे यश आहे.

**भाषाशैली**

अण्णा भाऊंनी साताऱ्याचे मार्मिक वर्णन या दोन कादंबऱ्यांतून केले आहे. तसेच त्यांनी संवादासाठी अस्सल सातारी बोलीभाषाही वापरली आहे. त्यांच्या कादंबऱ्यांतील वातावरण ग्रामीण असल्याने त्यांची पात्रे ग्रामीण बोली बोलतात. खेड्यातील लोकांच्या बोलण्यातील अस्सलपणा त्यांच्या साहित्यातून दिसतो. त्यांनी लेखनासाठी ग्रामीण भाषा वापरली असली तरी साहित्यातील वेगवेगळ्या वर्णनांसाठी (व्यक्ती, प्रसंग, निसर्ग) समकालीन साहित्यिकांचे त्यांनी अनुकरण केले आहे. डॉ. रणधीर शिंदे म्हणतात, 'अण्णा भाऊ ज्यावेळी लिहीत होते त्यावेळी मराठी वाङ्मयाभिरुचीवर फडके-खांडेकर यांच्या लेखन तंत्राचा मोठा प्रभाव होता. त्या वातावरणाचा काहीएक प्रमाणात परिणाम अण्णा भाऊंच्यावर झाला आहे.'[७] या विधानाची प्रचिती त्यांच्या या दोन कादंबऱ्यांतूनही दिसून येते. घरावर आदळणाऱ्या घोंगावणाऱ्या वाऱ्याचे वर्णन करताना लेखक म्हणतात, 'ते घर कापरे भरल्याप्रमाणे थरथरत होते.' तर पावसाचे वर्णन 'बाहेर पाऊस थयथय नाचत होता व वारा त्याला साथ देत होता. जणू काय पाऊस व वारा यांनी हातात हात घालून त्या शिवाराविरुद्ध युद्धच पुकारले होते.' असे येते. 'वाघ बरा. लोक आता वाघाला भीत नाहीत, पण बंडखोर म्हटलं, की पोटात सुई गेल्यासारखं होतं माणसाला' असे क्रांतिकारकांचे सार्थ वर्णन येते. या क्रांतिकारकांच्या तोंडी 'वारा सुटला आहे. आपण उपणून घेतलं पाहिजे.' (अर्थ-



Scanned with OKEN Scanner

गद्दारांना अद्दल घडविण्याची हीच योग्य वेळ आहे.) अशी सांकेतिक भाषाही दिली आहे. तसेच 'करावं तसं भरावं', 'जिकडं खोबरं तिकडं चांगभलं', 'सशाला खळगा जामीन झाला', 'शेळी जाते जिवानिशी आणि खाणारा म्हणतो वातड कशी!', 'ज्याचा हात मोडेल, त्याच्या गळ्यात पडेल', 'ज्याचं वेड त्याला गोड' अशा ग्रामीण म्हणींचाही त्यांनी यथोचित वापर केला आहे. या भाषेला साताऱ्याचा ठसकेबाजपणा आहे.

**निष्कर्ष**

या दोन कादंबऱ्यांचा विचार केल्यास अभ्यासाअंती खालील निष्कर्ष निघतात -

१. दोन्ही कादंबऱ्यांतून स्वातंत्र्यचळवळीचे सार्थ वर्णन येते.

२. दोन्ही कादंबऱ्यांमध्ये साम्य असले तरी 'वारणेच्या खोऱ्यात' या कादंबरीतील नायक-नायिका देशासाठी प्राणांचे समर्पण करतात, तर 'मास्तर' कादंबरीतील नायक-नायिका देशासाठी प्रेमाचे समर्पण करतात.

३. 'वारणेच्या खोऱ्यात' या कादंबरीतील पोलीस पाटील प्रथम देशप्रेमी व नंतर देशद्रोही तर 'मास्तर' कादंबरीतील पोलीस पाटील प्रथम देशद्रोही व नंतर देशप्रेमी बनतात. त्यामुळे पहिल्या कादंबरीतील पाटलाला नायक मारतो; पण दुसऱ्या कादंबरीतील पाटलाला जीवदान मिळते.

४. अण्णा भाऊंनी सातारी बोलीभाषेचा, पोवाड्यांचा, लोकगीतांचा प्रसंगोचित वापर केला आहे.

५. क्रांतिकारी सातारा जिल्ह्याचे वर्णन वाचताना वाचकांचा ऊर देशाभिमानाने भरून येतो.

६. अण्णा भाऊ हे देशप्रेमाने भारावलेले साहित्यिक होते.

**समारोप**

अशा प्रकारे अण्णा भाऊंनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून देशाच्या स्वातंत्र्यासाठी हातभार लावलेला आहे. त्यांच्या साहित्याचा तत्कालीन वाचक या कादंबऱ्या वाचून देशप्रेमाने नक्कीच भारावलेला असेल यात तीळमात्रही शंका वाटत नाही. तसेच आजही वाचकांना त्यांच्या साहित्यातून स्फूर्ती, उत्साह, चेतना, आत्मविश्वास मिळतो. त्यांच्या साहित्याबद्दल आसाराम गायकवाड म्हणतात, 'गुलामगिरीच्या बेड्या फेकण्यास सतत प्रेरणा देऊन जनसामान्यात आत्मविश्वास



Scanned with OKEN Scanner

आणि सामर्थ्य निर्माण करण्याचे कार्य केले आहे.'[८] अशा वैविध्यपूर्ण लेखनामुळेच अण्णा भाऊ मराठी साहित्यात साहित्य सम्राट ठरले असे मला वाटते.

**संदर्भ-टीपा**


१) शिंदे रणधीर (संपा.) : 'अण्णा भाऊ साठे साहित्य-समीक्षा', प्रकाशक श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर, प्रथमावृत्ती २०११, पृ. क्र. ८९.

२) तत्रैव : पृ. क्र. ६२.

३) तत्रैव : पृ. क्र. ६३.

४) तत्रैव : पृ. क्र. ४१.

५) जोखे विजयकुमार (संपा.) : 'अण्णा भाऊ साठे चरित्र आणि कार्य', नाग-नालंदा प्रकाशन, इस्लामपूर, प्रथमावृत्ती २०१५, पृ. क्र. ६.

६) कांबळे अमर, चाळके शोभा (संपा.) : 'समग्र अण्णा भाऊ साठे', प्रकाशक अनिल म्हमाने, कोल्हापूर, प्रथमावृत्ती २०१७, पृ. क्र. २३१.

७) शिंदे रणधीर (संपा.) : 'अण्णा भाऊ साठे साहित्य-समीक्षा', प्रकाशक श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर, प्रथमावृत्ती २०११, पृ. क्र. १३.

८) गायकवाड आसाराम : 'लोकशाहीर तथा लोकलेखक अण्णा भाऊ साठे'.

९) 'लोकसाहित्यिक अण्णा भाऊ साठे समग्र वाङ्मय खंड - १' : शाहू प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, २०१४.

१०) 'साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे निवडक वाङ्मय कादंबरी खंड - २' : प्रकाशक-महाराष्ट्र शासन, प्रथम आवृत्ती, २०१७.

११) 'अण्णा भाऊ साठे यांचे पोवाडे व लावण्या' : प्रकाशक लोकवाङ्मय गृह, मुंबई, बारावी आवृत्ती, २०१७.



**- प्रा. डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात**

साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग

किसन वीर महाविद्यालय, वाई.

Email - sangramthorat750@gmail.com

मोबा. : ९६०४०४६०८४


★ ★ ★



Scanned with OKEN Scanner